# Affordable Technology

## गरम पाणी करणारी स्वस्तातील कळशी
## (Low Cost Water Heater Can)

### समस्या:

साथीच्या रोगांच्या काळात डॉक्टर पाणी उकळून पिण्यास सांगतात पाणी दिवसातून २-३ वेळा उकळून ठेवावे लागते. मोठे कुटुंब असेल तर वारंवार पाणी उकळून ठेवणे शक्य होत नाही.

### प्रकल्प:

आम्ही वरील समस्या सोडविण्यासाठी ऊर्जा-पर्यावरण विभागामध्ये कळशी, नळ, कॉईल, वायर, प्लग इ. साहित्य वापरून ही कळशी तयार केली आहे. ही कळशी फायबर A ग्रेड ची असल्याने विद्युत शॉक बसू शकत नाही. कळशीला छिद्र पाडून त्यात कॉईल बसविली आणि त्याचे स्वीच द्वारे कनेक्शन केले. ४ लिटर पाण्याला दीड ते दोन मिनिटांत उकळी येते. यात विद्युत ऊर्जेचे उष्णता उर्जेत रुपांतर होऊन धातूची कॉईल तापते त्यामुळे त्याच्या संपर्कातील पाण्यात विद्युत प्रवाह जाऊन पाणी देखील गरम होते. तोटीच्या सहाय्याने हे गरम पाणी आपण सहज घेऊ शकतो. याच पाण्याला गॅस वर उकळी येण्यासाठी ७-८ मिनिटे लागतात. याचा वापर गरम पाणी पिण्यासाठी होत आहे.

### एकूण खर्च: ४५० रुपये



LTI Let's Solve | 1 step™ towards making a difference... | Vigyan Ashram

तयारक – न्यू इंग्लिश स्कूल, मारुंजी
संपर्क - +91 9822968927
ईमेल - nesmarunji@gmail.com